ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आजच्या जागतिकीकरणाच्या काळात म. गांधीच्या विचारांची प्रासंगिकता

प्रा.डॉ.वानखेडे उमाकांत ज्ञानोबा
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
नवगण कला व वाणिज्य महाविद्यालय, परळी-वैजनाथ.

## प्रस्तावना :-



महात्मा गांधींचे स्थान भारतातच नव्हे, तर जगात अद्वितीय होते. हे गांधीजींचे विरोधकही मान्य करतात. बलाढ्य साम्राज्य शक्तीचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने करता येतो हे गांधीजींनी जगाला दाखवून दिले. ना.गोपाळकृष्ण गोखले यांना गांधीजींनी गुरु मानले होते. त्यांच्या सुचनेनुसार गांधीजींनी संपूर्ण भारताचा दौरा केला. भारतातील दारिद्र्य व ग्रामीण भागातील स्थिती पाहून गांधीजी अतिशय व्यथित झाले. गांधीजींच्या कार्याचा गौरव करताना ना.गोपाळकृष्ण गोखले म्हणतात की, "गांधीजी भारतीय संस्कृतीचा परमोच्च विकास होते."[१] यावरून भारताच्या विकासात गांधीजींची भूमिका किती महत्त्वपूर्ण होती हे लक्षात येते. महात्मा गांधीच्या संदर्भात बाबा आमटे म्हणतात की, "गांधीचे महात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाहीत. उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटवण्यासाठी कदाचित संगणक लागेल, पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून टाकता येणार नाही."[२] अल्बर्ट आईस्टाईन या वैज्ञानिकाने गांधीजीसंबंधी लिहून ठेवले आहे की, "आनेवाली पिढियाँ को इस बात पर विश्वास करना मुश्किल होगा की गांधी जैसा कोई व्यक्ती इस धरतीपर चला करता था|"[३] महात्मा गांधींनी मानवी जीवनाच्या विविध प्रश्नांवर विचार व्यक्त केले आहेत. हे प्रश्न कधी परस्परांशी निगडीत तर कधी परस्परासंबंधीत असत. त्यामुळे लेखनास स्फुट लेखनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तरी सुध्दा निश्चित अशा अध्यात्मिक, नैतिक भूमिकेतून ते या सर्वच प्रश्नांकडे पाहत असल्यामुळे वर-वर स्फुट वाटणाऱ्या त्यांच्या विचारातही सुसंगती निर्माण करणारा बळकट असा नैतिक धागा सर्वत्र जाणवल्यावाचून राहत नाही. आज जागतिकीकरणाचा स्विकार करण्यात आला आहे. जागतिकीकरणाच्या काळात महात्मा गांधीच्या विचारांची आवश्यकता आहे. आज अनेक प्रश्न आणि समस्या आहेत की ज्यामुळे मानवी जीवन विस्कळीत होत आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात गांधी विचारांची प्रासंगिकता कशी आहे समजून घेण्यासाठी गांधीजींचे विचार अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. खालील मुद्यांच्या आधारे आपल्याला स्पष्ट करता येईल की गांधीजींच्या विचारांची जगाला आवश्यकता अहे.

## १) शांततामय सहजीवनासाठी -

महात्मा गांधी म्हणतात की, "अमेरिकन बांधवांना चरख्याची ओळख करून द्यावीशी वाटते. चरखा हे चिंतनशील यंत्र हे त्यांना अणुबाँबचा विसर पाडेल. म्हणजेच सामान्य माणसाच्या प्रश्नाचा विचार करू लागला, तर अणूबाँबची आठवण होणार नाही. " ग्लोबल पॅराडॉक्स या ग्रंथात म्हटले आहे की, "वंश, जात, धर्म, पंथ, भाषा याबाबत मानव समूहात अहंभाव तीव्र झाल्यामुळे जगभर हिंसाचार, रक्तपात उसळला आहे. आज पॅलेस्टनी, इस्त्राईल युध्दाचे विवेचन करताना गांधींचा सहजीवनाचा आग्रह किती महत्त्वाचा होता हे लक्षात येते. अन्याय जूलूमाने सर्व प्रश्न सोडवता येत नाहीत. गांधीजी म्हणाले होते, शत्रूने एका गालावर मारली तर दूसरा गाल पुढे करा पण स्वतः हात उगारू नका. पण त्याचवेळी आपल्या मुद्यावर पण आडून रहा."[४]

### २) बेकारी कमी करण्यासाठी -

अप्रोचिंग टवेन्टीफर्स्ट सेंच्युरी या पुस्तकात पॉल कनेडीने आधुनिक तंत्रज्ञानाने उत्पादन वाढवता येईल, पण बेकारीचा प्रश्न कसा सोडवता येईल, याकडे लक्ष वेधले व आज भांडवल गुंतवून तंत्र विज्ञानाधिष्ठीत कारखाने निघत आहेत. त्यामुळे नव श्रीमंताचा एक वर्ग वाढत आहे. परंतु त्याचे फायदे गरीब माणसाला मिळण्याची शक्यता नाही. बेकारी कमी करण्यासाठी आपल्याला पुन्हा गांधी विचारांच्या आधारे उत्पादन व्यवस्थेची उभारणी करावी लागेल. प्रत्येकालाच उत्पादन व्यवस्थेत सहभागी करून घेतले तर बेकारीचा प्रश्न आपोआप मिटेल.[५] गांधीजींनी सांगितले कृतिशील उपक्रम या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

### ३) खेड्याच्या विकासासाठी -

आज खेडी ओस पडलेली असून अनेक समस्यांनी वेढलेली आहत. तेंव्हा आज गांधी विचार खऱ्या अर्थाने महत्त्वाचा आहे. गांधीजींच्या विचारांचे केंद्र खेडे होते. विकासाची सुरुवात खेड्यापासून व्हावी असे त्यांचे म्हणणे होते. ग्रामउद्योग, खादी असे अनेक कार्यक्रम त्यांनी खेड्याच्या स्वयंपूर्णतेसाठी समोर ठेवले. आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात विकेंद्रीकरण झाले पाहिजे या मताचे गांधीजी होते. गांधीजी म्हणतात की, प्रत्येक गाव स्वावलंबी राहील. सहकार्य हा त्याचा आधार राहील. गावातील लोकशांतीपूर्ण व गौरवशाली जीवन व्यतीत करतील. प्रत्येक गावात पंचायत राहील. अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच शक्य आहे."[६] खेड्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने गांधीजींचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. खेड्यात लघूउद्योग व कुटीरउद्योगांना महत्वाचे स्थान दिले पाहिजे. खेड्यातील लोकांना नोकरीसाठी इतरत्र जावे लागू नये असे गांधीजींना वाटत असे.

### ४) भ्रष्टाचार निर्मूलनासाठी -

जगातील लोकशाही शासनपध्दतींना निष्प्रभ करण्याचे काम इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा भ्रष्टाचार अधिक प्रभाविपणे करीत आहे. केवळ भारतातच भ्रष्टाचाराचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे असे नाही तर जगातील विकसित आणि अविकसित देशात भ्रष्टाचाराचा प्रश्न भेडसावत आहे. स्वित्झर्लंड, जपान, इटली, अमेरिका अशा विविध देशांत भ्रष्टाचार, लाचलुचपत, काळा पैसा या गोष्टी आढळून येतात.[७] भ्रष्टाचारासंबंधी सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी म्हटले होते की, भ्रष्टाचार एवढा वाईट आहे की ज्याच्यावर सर्व बाजूंनी सर्व पातळ्यावरून मात केली पाहिजे. आज भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. अशा परिस्थितीत गांधीजींचा नैतिक आचरणात्मक आग्रह कसा अनमोल होता हे जाणवेल. गरजा कमी, साधी राहणी, मूल्याधिष्ठीत विचार यामुळे भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होते.

### ५) पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्व -

आज पर्यावरणीय समस्या यात वृक्षतोड, जलप्रदूषण, हवा प्रदूषण, वैद्यकीय कचरा, ओझोन समस्या अश अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. हरितक्रांतीचे शिल्पकार व नोबेल पुरस्काराने सन्मानित कृषी शास्त्रज्ञ डॉ.नॉर्मन बोरलॉग नुकतेच भारतात येऊन गेले. रासायनिक खतं आणि किटकनाशकांमुळे हरितक्रांतीला बट्टा लागला का? असे विचारले असता ते म्हणाले, हरितक्रांतीच्या काळात संशोधन, विस्तार, वितरण या सर्व यंत्रणांना एकत्र आणलं होतं, सर्वांना एकच उद्दिष्ट दिलं होतं. वैज्ञानिकांसह सर्वांनी त्यासाठी स्वतःला झोकून दिलं होतं. तरीही विज्ञान प्रसारात काही त्रूटी राहिल्या. खत आणि किटकनाशक या दोन भिन्न बाबी आहेत. खतामध्ये वनस्पतीचं जीवनसत्व असतं तर किटकनाशक हे विष आहे, दोन्हींचा वापर विचार करून केला पाहिजे. अति वापर केला तर हानी होणारच."[८] आज तंत्रज्ञानाच्या साह्याने जी वाढ झालेली आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. हवा, पाणी, अन्न, दुषित होत असून जमीन वन यांचा वेगाने ऱ्हास होत असल्याचा गंभीर इशारा अनेक अहवाल व अभ्यासातून होत आहे. ही बाब गांधीजींनी १९०९ मध्ये लिहलेल्या हिंदस्वराज्य या ग्रंथात मर्मभेद पध्दतीने व्यक्त केली होती. औद्योगिक व्यवस्थेचे त्यांनी सैतान संस्कृती असे वर्णन केले. आजच्या काळात ज्या पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत, यावर मार्ग काढण्यासाठी गांधी विचार महत्वाचा आहे.

### ६) जगाला विनाशातून वाचवण्यासाठी -

हिंसेच्या साम्राज्यात ज्यांनी अहिंसेच्या सिध्दांताचा शोध लावला. त्या ऋषींना ते न्यूटनपेक्षाही अधिक थोर संशोधक व वेलिंग्टन पेक्षाही अधिक थोर लढवय्ये मानतात. शस्त्रे कशी चालवायची याचे ज्ञान झाल्यानंतर ती विफल कशी आहेत याची त्यांना जाणीव झाली व हिंसेने नव्हे तर अहिंसेने मुक्ती होईल, असे त्यांनी जगाला सांगितले असे गांधीजींनी म्हटले आहे.[९] आज शस्त्रास्त्र निर्मितीची स्पर्धा अनेक देशांमध्ये सुरु झाली आहे. प्रत्येक देश शस्त्र निर्मिती करून आपली शक्ती वाढवत आहे. शस्त्रनिर्मितीमूळे युध्दजन्य परिस्थिती निर्माण होत आहे. आता सर्वोदय आणि सर्वनाश यातून एकाची निवड मानवाला करायची आहे. सर्वनाशाचा मार्ग कोणीही निवडणार नाही.

## ७) आर्थिक विषमता कमी करण्यासाठी -

आज एका बाजूला श्रीमंत व दुसऱ्या बाजूला प्रचंड गरीबी अशी मोठी दरी निर्माण झालेली दिसते. गांधीजी म्हणतात की, समाजातील जमीनदार व भांडवलदार ह्यांनी शेतकरी व मजूरांचे विश्वस्त म्हणून काम करावे. जमीनदार व भांडवलदाराजवळ असलेली संपत्ती म्हणजे समाजाने त्यांच्याजवळ ठेवलेली ठेव आहे व त्यांनी त्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून कार्य करावे.[१०] त्या संपत्तीचा उपयोग त्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी करू नये. त्यांनी आवश्यक तेवढीच संपत्ती स्वत:साठी वापरून उरलेली संपत्ती समाजाची आहे असे समजावे. उरलेल्या संपत्तीचा उपयोग समाजातील गरीब व दुर्बल घटकांसाठी करावा. प्रत्येक व्यक्तीने आपली संपत्ती मर्यादित ठेवून त्यागाची नीती स्विकारावी. प्रत्येकाला राहायला घर मिळावे. खाण्यासाठी पूरेसे अन्न मिळावे व घालायला कपडे मिळावेत. यालाच ते समता म्हणतात. महात्मा गांधीचा विश्वस्ताचा सिध्दांत हा आजच्या काळात महत्त्वाचा आहे. आज समाजात गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग असलेले दिसून येतात.

अशा प्रकारे जागतिकीकरणाच्या काळात महात्मा गांधींच्या विचारांची आज गरज आहे. आजच्या काळात मानवाला अनेक समस्यांनी ग्रासून टाकले आहे. तसेच मानवी जीवनात जीवघेण्या स्पर्धा सुरु झाली आहे. म.गांधींच्या विचारांचे मंथन केल्यावर असे लक्षात येते की, गांधीजींनी या देशातील सामाजिक, आर्थिक व राजकीय चिंतनाला व कार्याला नवीन दिशा दिली आहे. महात्मा गांधीच्या विचारात परंपरा व आधुनिकता यांचे संमिश्रण आहे. यातच त्यांच्या अफाट आकर्षणाचे अमर्याद लोकप्रियतेचे व सर्वमान्त्र महात्मतेचे रहस्य आहे. संक्रमणकालीन भारताचे गांधी हे मुर्तीमंत प्रतीक होते. महात्मा गांधी हे माओत्से तुंगपेक्षाही अधिक मौलीक क्रांतीचे प्रणेते होते. गांधीवादाने लिंकनच्या स्वातंत्र्यप्रेमाच्या, लेनीनच्या समताविषयक तळमळीशी समन्वय घालण्याचा प्रयत्न केला आहे. भारताला भावी काळात नव्हे तर संपूर्ण जगाला गांधी विचाराखेरीज तरणोपाय नाही.

## संदर्भ -


१) प्रा.दिगंबर डी.बिरादार पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, २०११, पृष्ठ क्र.१२६.
२) डॉ.विलास आघाव, भारतीय राजकीय विचारवंत, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१४, पृष्ठ क्र.९८.
३) m.livehindustan.com
४) m.maharastratimes.com
५) प्रा.दिगंबर डी.बिरादार पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड, २०११, पृष्ठ क्र.१२२.
६) डॉ.अरविंद श्रृंगारपुरे, समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६, पृष्ठ क्र.२९.
७) प्रा.बी.बी.पाटील, लोकप्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६, पृष्ठ क्र.३६१
८) प्रा.सचिन पेंडसे, पर्यावरण अभ्यास, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक, २०१५, पृष्ठ क्र.९२
९) डॉ.विलास आघाव,भारतीय राजकीय विचारवंत, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१४,
पृष्ठ क्र.१०४.
१०) डॉ.राष्ट्रपाल गणवीर, राजकीय सिध्दांत आणि राजकीय विचारवंत, सर साहित्य केंद्र, नागपूर, २०१५, पृष्ठ क्र.२५४.